**संक्षिप्त फौजदारी खटला क्रं. ४४५/२०२१**
**उमाकांत बिरादार वि. संगम बिरादार**
**नि.क्र. ४१ लगत**

**साक्षीदार क्र. २ श्री प्रभाकर माणिकराव तपशाळे यांचा उलटतपास विधिज्ञ श्री. एस.बी. पाटील यांच्यातर्फे शपथेवर सुरू ः-**

हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी माझा मामे भाउ आहे. आम्ही दोघे जण एकाच गावात राहतो. फिर्यादी यांचे ऋषिकेश अॅटोमोबाईल म्हणून उमा चौकात दुकान होते. तीन - चार वर्षापूर्वी दिवाळे निघाले म्हणून दुकान बंद झाले. आरोपी काय व्यवसाय करतो ते मला माहिती नाही. पण तो फिर्यादीकडे आला होता. आरोपीचे ममता मोबाईल अॅण्ड रिपेरिंगचे दुकान होते कि काय मला माहिती नाही. संगम हा पैसे घेवून गाडी घेवून देतो म्हणून असा व्यवहार फिर्यादीने केला होता. ०५.०८.२०१९ ला व्यवहार झाला पण त्या दिवशी पैसे दिले नाहीत. साक्षीदार परत सांगतो पैसे दोन दिवसानी नाही, दि. ०५.०८.२०१९ रोजी दिले. फिर्यादीने अॅटोमोबाईलच्या दुकानातून पैसे दिलेले होते. मी गेलो त्यावेळी त्याच्या जवळ फिर्यादीकडे पैसे होते. त्यावेळी मी गाडीचा मालक कोण आहे, कोणती गाडी आहे याची मी चौकशी केली नाही. त्यावेळी कोणताही कागद व पावती लिहण्यात आलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीकडे गेलो असताना माझ्या समक्ष फिर्यादीने साडे तीन लाख रुपये आरोपीला दिले हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, उमाकांतची आरोपीला साडे तीन लाख रुपये देण्याची ऐपत नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, उमाकांत हा माझ्या मामाचा मुलगा असल्यामुळे मी आज खोटी साक्ष देत आहे.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.10.17 11:41:18 +0530

दिनांकः- १६.१०.२०२५

न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर